क्र. २०११/पुरवठा/१/बीपीएल/कावि- दिनांक :०८/१०/२०११

प्रति,

कार्यकारी संचालक,
१..मांजरा शेतकरी सह.सा.का.लि.विलासागर ता.जि.लातूर.
२.शिवाजीराव पाटील निलंगेकर सह.सा.का.लि.झारी अंबुलगा बु ता.निलंगा जि.लातूर
३. विकास सह.सा.का.लि.निवळी ता. जि.लातूर
४ श्री.संत शिरोमणी मारुती महाराज स.सा.का.लि.बेलकुन्ड ता.औसा जि.लातूर
५.श्री साईबाबा शुगर लि.शिवणी बु. गोदरी ता.औसा जि.लातूर

विषय :- माहे आक्टोबर 2011 करीता लेव्ही साखरेचे नियतन

संदर्भ :- महाराष्ट्र शासन अन्न नगरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई क्र.साखर१८११/प्र.क्र.११७/नापू-१९ दि.३० सप्टबर_२०११

शासनाने माहे आक्टोबर 2011 साठी लेव्ही साखर शिधापत्रिका धारकाना वाटप करण्यासाठी (3148) क्विटल साखरेचा कोठा लातूर जिल्हयासाठी मंजूर केलेला आहे. सदरील 3148 क्विटल साखरेचे नियतन सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्या प्रमाणे या जिल्हयातील शुगर नॉमिनीच्या नावांने मंजुर करण्यांत येत आहे.

नॉमिनीच्या नावाने वितरण आदेश देण्यांत येत आहे. वितरण आदेश मिळाल्यापासुन साखरेची वितरण त्वरीत देण्यांत यावे. साखरेच्या वितरणाचा अहवाल प्रत्येक आठवडयांच्या शनिवारी विहित नमुन्यांत या कार्यालयास पाठवावा.तसेच वितरणाचा अंतिम अहवाल दिनांक 30/10/2011 रोजी या कार्यालयास फॅक्सने पाठवावा.

जिल्हाधिकारी,लातूर.

प्रतिलिपी

1) मा.प्रधान सचिव अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई 32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2) वित्तीय सल्लागार व उप सचिव अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग 42 सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग मुंबई 20.
3) उप संचालक नागरी पुरवठा पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत शासकीय कुटीर क्र.5 व 7 प्लॉट क्र.176 फ्री प्रेस जर्नल मार्ग मुंबई.
4) उप आयुक्त पुरवठा विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

प्रतिलिपी आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

5) उप विभागीय अधिकारी लातूर /उदगीर /निलंगा.
6) सर्व तहसिलदार ----------------------- जिल्हा लातूर यांना देवून सुचित केले जाते की माहे माहे आक्टोबर 2011 साठी लेव्ही साखरेची शिधापत्रिका धारकांना वाटप करण्यासाठी दर प्रतिव्यक्ती 500ग्रॅम या परिमाणानुसार आपल्या तालूक्यांत नियंत्रित परिमाणात वाटप करण्यासाठी साखरेचे

नियतन दिलेले आहे.सदरील नियतन फक्त दरिद्रय रेषेखालील शिधापत्रिका धारकांना प्रति किलो 13.50 पैसे या किरकोळ विक्री दराने वितरीत करावी.लेव्ही साखर कार्डधारकांना शासनाने ठरवून दिलेल्या परिमाणांत वाटप करतांना मागील महिन्यांचा कोठा व्यपगत होवू नये म्हणुन तो पुढील महिन्यांत देण्याकरिता शासन परिपत्रक क्र.क्युएलटी 1085/कार्यासन17/ दिनांक 30.8.1985 अन्वये दिलेल्या आदेशाची काटेकोरपणे पालन करावे रास्त भाव दुकानदारास नॉमिनीने कारखान्यांची नियंत्रित साखर प्रति क्वि.1339.59 पैसे या गोदाम दराने देण्यांस सुचितकरावे.अणि कार्डधारकांना वितरीत करण्यांत येणा-या साखरेची किरकोळ विक्री दारिद्रिय रेषेखालील शिधापत्रिका धारकांना प्रति किलो 13.50 पैसे या किरकोळ विक्रीदराने लागु राहिल. नॉमिनीना नियतन मंजूर करण्यांत आलेल्या संपूर्ण साखरेची रक्कम संबधित साखर कारखान्यास दिनांक 30/10/2011 पुर्वी चुकती करुन दिनांक 30/10/2011 पर्यत संपुर्ण साखरेची उचल करुन ती साखर स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत कार्डधारकांना महिन्यांच्या सुरुवातीला ठरवून दिलेल्या परिमाणांत वाटपासाठी वेळेवर उपलब्ध ठेवावी.म्हणजे संपुर्ण स्वस्त धान्य दुकानदारांना ही उपलब्ध करुन देण्यांची अवश्यक ती योजना करावी.अणि नियंत्रित साखरेचे वाटप कार्डधारकांना महिन्यांच्या सुरुवातीपासून विहित प्रमाणात वाटप करण्यांची दक्षता घ्यावी.

नॉमिनीकडे शिल्लक असलेला साखरेचा कोठा या कार्यालयास दिनांक 30/10/2011 रोजी कळवावा.तालूक्यांत माहे आक्टोबर -2011 साठी दिलेला कोठा कोणत्याही परिस्थीत व्यापगत होणार नाही यांची दक्षता घ्यावी. जर नियुक्त केलेल्या नॉमिनीनी ठरवून दिलेल्या मुदतीत नियंत्रित साखर उचलीत नसल्यांचे दिसुन आल्यास ही साखर उचलन्यासाठी खाजगी नॉमिनी नेमण्यांचा प्रस्ताव तात्काळ या कार्यालयास पाठवुन पर्यायी व्यवस्था करावी. नॉमिनीने साखर कारखान्याकडून साखर उचल केलेल्या साखरेचा अहवाल दर सोमवारी या कार्यालयास पाठवावा. साखरेचे वितरण दि. 10/10/2011 पासून करावे.माहे आक्टोबर 2011 या महिन्यासाठीची साखर ही शिधापत्रिका धारकांना सप्टेबर 2011 या महिन्यांच्या नियतनातूनच वाटप करावी.

7)सर्व नॉमिनीनां देवून कळविण्यांत येते की, मंजूर केलेल्या नितनाची संपूर्ण उचल दिनांक 30/10/2011 पूर्वी पूर्ण करावी. व ट्रक ओव्हर लोडींग होणार नाही याची दक्षताघ्यावी.वाहतुकीचा दैनंदिन अहवाल या कार्यालयास दररोज सादर करावा.कोणत्याही परिस्थितीत नियतन व्यपगत होणार नाही याची दक्षता घ्यावी. नियतन व्यपगत झाल्यास त्यास आपणास व्यक्तीशः जबाबदार धरून नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

8)पुरवठा निरिक्षक व जिल्हा पुरवठा तपासणी अधिकारी यांना देवून सुंचित करण्यांत येते की नॉमिनीने त्यांना ठरवून दिलेल्या तारखे प्रमाणे साखरेच्या कोठयाची उचल केली किंवा नाही यांचा अहवाल या कार्यालयास पाठवावा व नियंत्रण ठेवावे.

9)प्रत सर्व नॉमिनी जिल्हा लातूर यांना देवून सूचित केले जाते की, स्वस्त धान्य दुकानदाराना कारखान्यांची लेव्ही साखर प्रति क्विटल 1339.59 पैसे या दराने उपलब्ध करून दयावी.आपणांस मंजूर केलेल्या नियतनाची संपुर्ण साखरेची रक्कम संबधित कारखान्यांस दिनांक 30/10/2011 पुर्वी चुकती करून साखरेची वाहतुक त्यांनी स्वतः करून उचल केलेल्या साखरेचे सी फार्म मधील माहिती गेटपास,जकात पावत्या,व वहातूकीचे बिलासह दिनांक 30/10/2011 रोजी सादर करावी.

स्वस्त धान्य दुकानदारांना लेव्ही साखर प्रति क्वि.1339.59 पैसे या दराने नियतन केलेली संपुर्ण साखर दिनांक 30/10/2011 पर्यत संबंधित साखर कारखान्या कडून उचल करावी साखरेच्या उचली बाबतचा अहवाल दररोज या कार्यालयास देण्यांत यावा.उचल पुर्ण झाल्यानंतर महिना अखेरीस स्वस्त धान्य दुकानदार यांना वाटप केलेल्या साखरे बाबतची माहिती बिनचूक विहित नमुन्यांत या कार्यालयास पाठवावी.

10) जिल्हा माहिती अधिकारी प्रशासकीय इमारत लातूर यांना देवून कळविण्यात येते की स्थानिक दैनिकात व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

जिल्हाधिकारी, लातूर.

विवरणपत्र- माहे आक्टोबर 2011

| तालुका | अ क्र | साखर नॉमिनीचे नांव | मांजरा शेतकरी सह.सा. का.लि. विलास नगर ता.जि. लातूर. 10-11 | शिवाजीराव पाटील निलंगेकर सह.सा. का.लि. झारी अंबुलगा ता.निलंगा 10-11 | विकास सह.सा. का. लि.नवळी ता.जि. लातूर १०-११ | श्री संत शिरोमणी मारुती महाराज स.सा. का.लि. बेलकुन्ड ता.औसा जि लातूर 10-11 | श्री साईबाबा शुगर लि. शिवनी बु. गोदरी ता. औसा जि. लातूर 10-11 | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 294 | 593 | 843 | 757 | 661 | 3148 |
| लातूर | 1 | एस.आर.गोरे,लातूर | 00 | 00 | 300 | 00 | 00 | 300 |
| | 2 | जे.एस.पल्लोड रा लातूर | 00 | 00 | 150 | 00 | 00 | 150 |
| | 3 | एस.व्ही. मगर रा. लातूर | 00 | 00 | 180 | 00 | 00 | 180 |
| | | एकूण | 00 | 00 | 630 | 00 | 00 | 630 |
| औसा. | 1 | मे राचटटे टेडर्स औसा | 00 | 00 | 00 | 00 | 199 | 199 |
| | 2 | ए.आर.पाटील,औसा | 00 | 00 | 00 | 00 | 200 | 200 |
| | | एकूण | 00 | 00 | 00 | 00 | 399 | 399 |
| रेणापूर | 1 | स्वस्तीक एजन्सी रेणापूर | 00 | 00 | 100 | 00 | 00 | 100 |
| | 2 | डि.आर.बिरादार रेणापूर | 00 | 00 | 113 | 00 | 00 | 113 |
| | | एकूण | 00 | 00 | 213 | 00 | 00 | 213 |
| निलंगा | 1 | सिध्देश्वर टे.कं.कासारशिरसी ता. निलंगा. | 00 | 324 | 00 | 00 | 00 | 324 |
| | | एकूण | 00 | 324 | 00 | 00 | 00 | 324 |
| शि.अं. | 1 | तिरुपती ट्रेडिंग कंपनी शिरुर अनंतपाळ | 00 | 102 | 00 | 00 | 00 | 102 |
| | | एकूण | 00 | 102 | 00 | 00 | 00 | 102 |
| उदगीर | 1 | चे.व्यापारी ना.प.सं.म उदगीर/पर्यायी सचिन ट्रे.कं.उदगीर | 00 | 00 | 00 | 182 | 00 | 182 |
| | 2 | सचिन ट्रेडिंग कंपनी उदगीर | 00 | 00 | 00 | 200 | 00 | 200 |
| | 3 | राजकुमार ट्रेडींग कं.उदगीर | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 |
| | | एकूण | 00 | 00 | 00 | 382 | 00 | 382 |
| जळकोट | 1 | संत जनाबाई महिला मंडळ,सोनवळा. | 00 | 00 | 00 | 60 | 00 | 60 |
| | 2 | आनंदराव बाबाराव सोनटक्के .जळकोट | 00 | 00 | 00 | 100 | 00 | 100 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | 00 | 00 | 00 | 160 | 00 | 160 |
| देवणी | 1 | संदिप ट्रेडर्स देवणी | 00 | 00 | 00 | 165 | 00 | 165 |
| | | एकू ण | 00 | 00 | 00 | 165 | 00 | 165 |
| अहमदपूर | 1 | चे.शि.ता.वि.का.से. सो.शिताजबंद ता.अहमदपूर | 200 | 00 | 00 | 00 | 00 | 200 |
| | 2 | पी.के.साळी, अहमदपूर | 00 | 167 | 00 | 00 | 53 | 220 |
| | 3 | एम.व्ही. बावगे,किनगांव | 94 | 00 | 00 | 00 | 00 | 94 |
| | | एकूण | 294 | 167 | 00 | 00 | 53 | 514 |
| चाकूर | 1 | चे.विशाल का.से.सो.चाकूर | 00 | 00 | 00 | 50 | 00 | 50 |
| | 2 | पी.के.साळी,चाकूर (बीएसएफ-45क्विटल) | 00 | 00 | 00 | 00 | 119 | 119 |
| | 3 | निता अशोक फुलारी चाकूर | 00 | 00 | 00 | 00 | 90 | 90 |
| | | एकूण | 00 | 00 | 00 | 50 | 209 | 259 |
| | | एकूण जिल्ह्याची बेरीज | 294 | 593 | 843 | 757 | 661 | 3148 |

जिल्हाधिकारी,लातूर.